




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार १७ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# आता कोणत्याही पक्षात फिरा, पण मत देताना मनोज जरांगे यांचा मराठा समाजास मतदानापूर्वीची टीप



## मतदान करताना विचारपूर्वक...

मी मराठा समाजाला बंधन मुक्त केले आहे. ज्याला पाडायचे त्याला पाडा. ज्याला निवडून आणायचे त्याला निवडून आणा. मी माझा मराठा समाज कोणाच्याही दावणीला बांधलेला नाही. मी माझ्या समाजालाच मालक ठेवला आहे. समाजाला आरक्षण देण्यासाठी मी खंबीर आहे. फक्त राजकारण डोक्यातून काढून टाका. या राज्यात माझे मराठे शंभर टक्के मतदान करणार आहेत. मराठ्यांनी मतदान करताना विचारपूर्वक मतदान केले पाहिजे, असेच मी आवाहन करत असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

## मतदान करताना हे लक्षात ठेवा

मनोज जरांगे म्हणाले, मराठा समाजामध्ये प्रचंड आक्रोश आहे. मराठा समाज दारिद्र्यात लोटला गेला आहे. त्यामुळे आता तो रस्त्यावर उतरला आहे. महाराष्ट्रातील मराठा समाजाला माझी विनंती आहे. आता तुम्ही संभ्रमात राहू नका. मतदान केंद्रावर जाताना फक्त जात मुलगा आणि मुलगी हे डोळ्यासमोर ठेवा. त्यानंतरच मतदान करा. आपल्याला जात मोठी केल्याशिवाय आणि आपली लेकरे मोठी होणार नाही. त्याशिवाय समाज घडवणार नाही. महाराष्ट्रातील मराठा समाजाला माझी विनंती आहे. आता तुम्ही संभ्रमात राहू नका. मतदान केंद्रावर जाताना फक्त जात मुलगा आणि मुलगी हे डोळ्यासमोर ठेवा. त्यानंतरच मतदान करा. आपल्याला जात मोठी केल्याशिवाय आणि आपली लेकरे मोठी होणार नाही.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या मैदानातून मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी माघार घेतली आहे. त्यानंतरही ते मराठा समाजाने कोणाला मतदान करावे? त्यासंदर्भात वक्तव्य करत आहे. मनोज जरांगे यांनी म्हटले की, मी जे लोकसभेला सांगितले तेच विधानसभेला सांगत आहे. माझा मराठा समाज बुद्धिजीवी आहे. तो थोडाही संभ्रमात राहत नाही. मराठा समाज बरोबर पाडणार आहे. आता तुम्ही कोणत्याही पक्षात फिरा. परंतु मतदान करताना लेकरांच्या आणि जातीच्या बाजूने पडले पाहिजे, हे लक्षात ठेवा, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

## शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या महायुतीला जागा दाखवा रोहित पवार यांचे अवाहन, पृथ्वीराज साठेंचे पारडे झाले जड

अंबाजोगाई/प्रतिनिधी: महायुतीच्या सरकारने पिकांच्या नुकसानीचे अनुदान व पिक विमा न दिल्याने शेतकरी व कष्टकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या या सरकारला जागा दाखवा, असे आवाहन रोहीत पवार यांनी शनिवारी (दि.१६) येथे केले. केज मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत रोहित पवार बोलत होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे, माजी आ.संगीता ठोंबरे, माजी आ.उषा दराडे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, अंजली घाडगे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.रोहित पवार महायुतीच्या कारभारावर सडकून टीका करताना म्हणाले, या सरकारने



तेलाचे भाव वाढवले पण शेतकऱ्यांकडे पिकणाऱ्या सोयाबीनचा भाव कमी केला. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. केज मतदार संघातील आमदारही शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करू शकले नाहीत. या सरकारचा अन्याय जनता आता सहन करणार नाही त्यामुळे महाविकास आघाडीचे सरकार राज्यात येणार आहे असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचे सरकार आल्यास आम्ही महिलांना प्रतिमा आतापेक्षा दुप्पट ३ हजार रूपये मानधन देणार, अंबाजोगाईसाठी एम आय.डीसी आणणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. अंबाजोगाईचा मुख्य प्रश्न जिल्हानिर्मीतीचा आहे. सरकार आल्याबरोबर मार्गी लावण्याचा प्रयत्न करू सांगून सर्वसामान्य उमेदवार पृथ्वीराज साठेंना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.बजरंग सोनवणे म्हणाले, मागच्या निवडणुकीत विद्यमान आमदाराचे पती यांनी शरद पवारांना सोडणार नसल्याची शपथ घेतली होती. तेच पवार साहेबांना १० दिवसात विसरण्याची आठवण करून दिली. यावेळी इतर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भाषणे झाली. सभेच्या प्रसंगी नागरीक व मतदारांनी पृथ्वीराज साठे यांना निवडणुक निधी सुपूर्द केला. हे पाहून सामान्य उमेदवाराला वोट पण व नोट पण मिळत असल्याचे वक्तव्य उपस्थितांनी केले.

## डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा- माजी आमदार जनार्दन तुपे

बीड दि.१६ : बीड विधानसभा मतदारसंघातून आघाडीवर असलेले महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांचे शहर व ग्रामीण भागात चांगले वारे आहे. कोणतेही महत्वाचे पद नसताना त्यांच्या हातून अनेक चांगली कामे झाली आहेत. त्यामुळे आता एक संधी देऊन त्यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करावे, असे आवाहन माजी आमदार जनार्दन तात्या तुपे यांनी केले आहे.पत्रकात पुढे म्हटले आहे की, डॉ.योगेश क्षीरसागर यांचे वडील, माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर हे माझे कौटुंबिक स्नेही आहेत. आमच्या कारकीर्दीत आम्ही ऐकमेकांना राजकीय, सामाजिक मदत केलेली आहे. अलिकडे डॉ.भारतभूषण क्षीरसागर हे प्रकृतीच्या कारणास्तव राजकारणात सक्रिय नाहीत. त्यांची कारकीर्द संस्मरणीय राहिली.



त्यांनी बीडच्या जनतेची ३५ वर्षे सेवा केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.योगेश व सारिका हे दोघे राजकीय, सामाजिक वाटचाल करत आहेत. त्यांच्या हातून आरोग्य सेवा, कोट्यवधींची विकासकामे, सांस्कृतिक, सामाजिक कार्य अशी अनेक चांगली कामे झाली आहेत. त्यांच्याकडून मतदारसंघातील जनतेची मोठी अपेक्षा आहे. आपण राजकारणात युवक वर्गाच्या पाठीमागे उभे रहावे, अशी माझी भावना होती. त्यामुळे सुशिक्षित, संयमी, विकासाची दूरदृष्टी असलेले युवक नेतृत्व डॉ.योगेशच्या पाठीमागे मतदारसंघातील माय–बाप जनतेने उभे रहावे, त्यांना बीड विधानसभा निवडणुकीत जनतेने एक संधी द्यावी, असे आवाहन माजी आमदार जनार्दन तात्या तुपे यांनी केले आहे.

# सुरेश धस यांच्या विजयासाठी नगराध्यक्षा दिपालीताई जाधव डोअर टू डोअर

पाटोदा: बबन पवार 231 आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या विजयासाठी पाटोदा नगराध्यक्षा सौ दिपालीताई राजू (भैय्या)जाधव या पाटोदा शहरांमध्ये प्रचार करत असून येथील महिलांचा त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे . जसजशी निवडणूक जवळ येत आहे तशी प्रचाराची रणधुमाळी मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे चित्र आष्टी मतदारसंघात पहावयास मिळत आहे. महायुतीचे उमेदवार माजी मंत्री सुरेश धस यांच्याप्रचारार्थ नगराध्यक्षा सौ दिपाली जाधव या सुरुवातीपासूनच प्रचारात उतरल्या आहेत. त्यांच्यासोबत प्रचारात मोठ्या प्रमाणावर महिलांनी सहभाग घेतला आहे. प्रत्यक्ष मतदारांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेत



केलेल्या विकासात्मक कामाची माहिती देण्यात आली. पुढील काळात विकासात्मक कामे मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे आश्वासन मतदारांना देत सुरेश धस यांना मतदान करण्याची विनंती केली. त्यांच्या या गाठीभेटीत ठिकठिकाणी नागरिकांचा, महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून सदरील निवडणूक आता जनतेनेच हातात घेतल्यामुळे सुरेश धस हे मोठ्या मताधिक्याने विजयी होणार असल्याचे मतदारातुन बोलले जात आहे. यावेळी महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता पाटोदा शहरात डोअर टू डोअर जाऊन प्रचार करीत "कमळ" या चिन्हा समोरील बटन दाबून सुरेश धस यांना मोठ्या मताने विजयी करावे असे आवाहन मतदारांना केले.

# या गद्दारांचं आता करायचं काय? भाषण सुरू असतानाच चिठ्ठीतून सवाल, शरद पवारांनी भरसभेत हा आदेश दिला




महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यात मोठ्या घडामोडी घडल्या. 2019 पासूनच राज्याच्या राजकारणाने वेगळ्या वाटेवर प्रवास सुरू केला. जिवलग मित्र एकमेकांचे शत्रू झाले. तर दोन-अडीच वर्षांपूर्वी राज्यातील दोन मोठ्या पक्षांना फुटीचा फटका बसला. शिवसेना दुभंगली. तर अजित पवार समर्थकांसह महायुतीच्या खेम्यात दाखल झाले. राष्ट्रवादीत उभी फूट पडली. राजकारणात गद्दार हा परवलीचा शब्द झाला. या गद्दारांचं करायचं काय असा सवाल भरसभेत शरद पवार यांना विचारण्यात आला. त्यावर पवारांनी थेट असा आदेश दिला. राजकारणा वेगळ्याच वळणावर 2019 मध्ये शिवसेना आणि भाजपात फाटलं. त्यानंतर पहाटेचा भाजप-राष्ट्रवादीचा शपथविधी झाला काय, अवघ्या काही तासाचं सरकार आलं काय, राष्ट्रपती राजवट लागली काय आणि नंतर धक्कातंत्र देत महाविकास आघाडीचं सरकार राज्यात सत्तेवर आलं काय, या घडामोडी वेगानं घडल्या. त्यानंतरही राज्यातील धक्कातंत्र कमी झाले नाही. राजकारणात हादरे नाही तर भूकंप आले. शिवसेनेत पहिला सुरुंग लावण्यात भाजपाला मोठं यश आले. एकनाथ शिंदे यांच्या रूपाने विश्वासू शिलेदार महायुतीच्या गोटात आला. महाविकास आघाडीचे सरकार गडगडले आणि महायुतीचे सरकार आले. त्यानंतर ऑपरेशन लोट्सचा प्रयोग राष्ट्रवादीवर झाल्याचा आरोप करण्यात आला. राष्ट्रवादीत उभी फूट पडली. या दोन घटनेनंतर राज्याच्या राजकारणात, पन्नास खोके एकदम ओके, गद्दार हे परवलीचे शब्द झाले. कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा राग दिसून आला. गद्दारांना धडा शिकवण्याची भाषा विधानसभेच्या प्रचारादरम्यान वारंवार झाली.

## वाईत राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी

योगायोग म्हणजे वाईमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना रंगला आहे. सातारा जिल्ह्यातील आठ मतदारसंघापैकी वाई हा एक विधानसभा मतदारसंघ आहे. वाई मतदारसंघात शरदचंद्र पवार गट आणि अजित पवार गट आमने-सामने आहे. या मतदारसंघात महायुतीमधील राष्ट्रवादीकडून आमदार मकरंद पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादीकडून अरुणादेवी पिसाळ या उमेदवार आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com


## दिव्य गुणांचा अभाव: झगडा-भांडण

जगात जेवढे म्हणून तंटे-बखेडे होतात, त्यांचे मूळ कारण म्हणजे कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाचा अभाव हेच आहे. माणसामाणसांमध्ये जी भिन्नता आढळून येते, तीसुद्धा कोणत्या ना कोणत्या दिव्य गुणाच्या उणिवेमुळेच होय. तेव्हा दुर्गुण सोडून दिव्य गुण धारण करण्यासाठी प्रोत्साहन देणे, हेच जगातील सर्व तत्त्वज्ञानाचे व धर्मग्रंथाचेही उद्दिष्ट आहे. संतश्रेष्ठ सत्यसम्राट हरदेवसिंहजी महाराज सत्य स्वीकारण्यास सांगताना म्हणतात-

"मक्खन ईश्वर रचनहार है छाछ तो इसकी माया है!
प्रभु सदा है कायम दायम माया तो एक छाया है!
निश्चय ही तू ग़ाफिल बन्दे आख़िर में पछताएगा!
सन्तजनों का जो मारग है वो मारग अपनाले तू!
कहे 'हरदेव' छोड़ नकल को बन्दे असल उठा ले तू!

(पवित्र हरदेव बाणी: पद क्र.२५३वा.ओळ क्र.५ ते १०.)

नागरिकांची बांधिलकी या चळवळीसाठी ते आवश्यक आहेत. आजचा विश्व सहनशीलता हा दिवस याच संदेशासाठी प्रायोजित केला आहे. मतभिन्नता किंवा दुसऱ्याची मते लादून घेणे म्हणजे सहनशीलता नव्हे, तर परस्परावरील आदराने आणि एकमेकांशी समेट करून जगण्याचा तो एक मार्ग आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे, हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. माणसातील अंतर्मुखता, गांभीर्य, धैर्य, शीतलता, नम्रता, संतुष्टता, सरलता हे सर्वही दिव्य गुण आहेत. या सर्वही गुणांमध्ये आणखी एक महान गुण आहे सहनशीलता. कोणतेही श्रेष्ठ उद्दिष्ट गाठायचे म्हणजे सारे काही सहन करावे लागते.

"खोद खाद धरती सहे, काँट कूँट बनराय|
कटु वचन साधु सहे, औरौं को सहा न जाए||"

दि.१६ नोव्हेंबर १९९५ पासून हा दिवस साजरा करण्यात येतो. मानवी मूलभूत हक्कांची जोपासना करीत असताना, मानवतेची अस्मिता जपताना, मानवी मूल्यांची कदर करीत आपल्या पुढच्या पिढीला युद्धाच्या अरिष्टापासून वाचविण्यासाठी असहनशीलतेचा अंत व्हावा, या उद्देशाने युनेस्कोने या दिवसाची घोषणा केली होती. मानवी बुद्धिमत्ता आणि एकजूट यांचा वापर करून पृथ्वीवर सर्वत्र व सतत शांती पसरावी, यासाठी राष्ट्रकुल सतत प्रयत्नशील असते. आजचे जग दहशतवाद, जातीयवाद, हिंसा, प्रांतीयवाद, तीव्र राष्ट्रीयता, मूलतत्त्ववाद आदींमुळे अस्वस्थ आहे. म्हणून राष्ट्रकुल आपल्या सदस्य राष्ट्रांना आवाहन करते, की जात, धर्म, भाषा, लिंग, राष्ट्र असे भेदभाव बाजूला सारून सकलांनी मानवतेच्या उद्धारार्थ सहनशीलतेची कास धरली पाहिजे. सहनशीलता हाही एक सद्गुण आहे व त्यामुळे सर्वत्र शांती नांदते. इतकेच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस हातभार लागतो. त्यासाठी राज्यपातळीवरील कायद्याने सर्व नागरिकांना समान हक्क दिले पाहिजेत. समाजातील विविध गटात मतभेद होऊ शकतात. पण ते मिटविण्यासाठी समर्थ यंत्रणा देखील कार्यरत असायला हवी. सहनशीलतेचा प्रसार होण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. सन २००५च्या विश्व परिषदेत या घोषणेचा पुनरुच्चार होऊन राष्ट्रीय नेत्यांनी आणि त्यांच्या सरकारांनी सहनशीलतेला उत्तेजन देऊन वेगवेगळ्या समाजगटात, संस्कृती विभागात तसेच लोकांमध्ये संवाद घडवून आणला पाहिजे. त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना रुजवून प्रगतीच्या दिशेने नेण्यास प्रयत्न असावेत. हा दिवस साजरा करण्यासाठी दहा मुद्यांवर भर दिला जातो- १) समाजातील विविधतेचा अभ्यास करा. अनेक वाद्ये एकत्रित येऊन वाद्यवृंद कर्णमधूर संगीत निर्माण करतो, हे उदाहरण लक्षात ठेवा. २) समाजातील विविध घटकांना, मग ते धामिर्क असोत, जातीय असोत, भाषेचे असोत, त्यांच्या मानवी हक्कांची जोपासना करा.३) स्वत:ची अशी सहनशीलता प्रकल्पाची योजना आखा. स्वत:ची दुसऱ्यांच्या जागी कल्पना करून बघा. ४) घरीदारी, शाळा-कॉलेजमध्ये, कामाच्या ठिकाणी, सार्वजनिक स्थळी हिंसेला थारा देऊ नका. ५) हवामान आणि पर्यावरण सगळ्यांशी सारख्याच प्रमाणात निगडीत असते. तेव्हा पर्यावरणाचा एखादा प्रकल्प राबवून सर्वांना एकत्र आणा. ६) सणावारी सर्वधर्मसमभाव प्रेरित करण्याचे मेळावे आयोजित करा. निरनिराळ्या धर्मातील तत्त्वांचा अभ्यास करा. ७) एखादी ताजी घटना घडली असेल तर तिचा उहापोह करण्यासाठी तज्ज्ञांची चर्चासत्रे भरवा. त्या घटनेचे मूळ कारण सकलांना कळू द्या. ८) खेळक्रीडांचे सामने सहनशिलता अंगी मुरविण्यास बऱ्यापैकी हातभार लावतात. समाजात खिलाडू वृत्ती रुजविण्याचा प्रयत्न करा.

# बुलडोझर न्याय बेकायदेशीरच!

सार्वजनिक हितासाठी सर्व खासगी मालमत्ता ताब्यात घेऊन त्याचे वाटप करण्याचा अधिकार घटनेने सरकारला दिलेला नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ५ नोव्हेंबर रोजी ७-२ अशा बहुमताने सुनावला होता. सर्व खासगी मालमत्ता समाजासाठी वापरता येतीलच असे नाही. स्वत:च्या कमाईची खासगी मालमत्ता संविधानाच्या अनुच्छेद ३९(बी) अंतर्गत समाजासाठी उपयुक्त मानली जाऊ शकत नाही, असेही घटनापीठाने स्पष्ट केले. मात्र काही प्रकरणांमध्ये खासगी मालमत्तेवर दावा केला जाऊ शकतो, असेही घटनापीठाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक मालमत्तेबाबत महत्त्वाचा निर्णय देताना स्पष्ट केले की, प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक संपत्ती समाजासाठी उपयुक्त मालमत्तेचे संसाधन असेलच असे नाही. म्हणजे प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक मालमत्ता समाजासाठी वापरता येईलच असे नाही. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील ९ न्यायाधीशांच्या घटनापीठापैकी ७ न्यायाधीशांनी या निर्णयाला पाठिंबा दिला व न्या. कृष्णा अय्यर यांचा यापूर्वीचा निर्णय नाकारला. दुस-या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर कारवाईवरून उत्तर प्रदेश सरकारला चांगलेच फटकारले आणि घर पाडल्याबद्दल संबंधिताला २५ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. उत्तर प्रदेशातील महाराज गंज जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका घरावर आणि दुकानावर बुलडोझर चालवून कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर अनेकांनी उत्तर प्रदेश सरकारवर टीकेची झोड उठवली होती. बेकायदेशीरपणे घरे पाडल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत. उत्तर प्रदेश सरकारची ही कारवाई कायदा आणि सुव्यवस्थेचे उल्लंघन करणारी आहे. तुम्ही लोकांची घरे कशी काय पाडू शकता, कारवाई करण्यापूर्वी सूचना का देण्यात आली नाही. घरावर बुलडोझरने कारवाई करणे हा अधर्म आहे अशा शब्दांत सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या पीठाने राज्य सरकारवर ताशेरे ओढले. या प्रकरणातील जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदाराची चौकशी करण्याचे आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. रस्ता रुंदीकरण करण्यासाठी घरे पाडण्याच्या विरोधातील याचिका २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. घर पाडण्यापूर्वी आपल्याला कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आली नाही, असा दावा याचिकाकर्ते मनोज टिब्रेवाल यांनी केला होता. ङ्गबुलडोझर कारवाईफ बाबत न्यायालयाने गुन्ह्याचा आरोप असणा-या व्यक्तीच्या घरावर बुलडोझर कारवाई करणे चुकीचेच नसून घटनाविरोधी असल्याची परखड टिप्पणी केली आहे. या निर्णयाने प्रशासकीय अधिका-यांच्या मनमानी कारभारावर वचक बसेल. सर्वोच्च न्यायालयाने कारवाईसंदर्भात कोणत्या नियमांचे पालन केले जायला हवे, याबाबतची नियमावली दिली आहे. अतिक्रमण निश्चित करण्यासाठी नोटीस, अभिलेख व नकाशांच्या आधारे सर्वेक्षण करावे लागणार असल्याने अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईला बराच कालावधी लागेल. त्या काळात आणखी अनधिकृत बांधकामे होण्याचा धोका आहे. घर असणे हा मूलभूत अधिकार असला तरी त्याने आपले घर कोठेही बांधणे कायदेशीर नाही. त्यावर कायदेशीर कारवाई व्हावी. या निर्णयाने संबंधित प्रशासकीय अधिकारी बुलडोझर कारवाई करण्यास धजावणार नाहीत. उत्तर प्रदेशात गुन्हेगारांवर झटपट कारवाई करण्यासाठी बुलडोझर न्यायाचा चुकीचा पायंडा पडला व त्याचे अन्य राज्यांमध्येही बेधडक अनुकरण केले जाऊ लागले. गेल्या काही वर्षांपासून काही राज्यांमध्ये कायदा धाब्यावर बसवून आरोपींची घरे पाडण्याच्या घटना वाढीस लागल्या. मुळात कोणताही आरोपी दोषी आहे हे ना महापालिका ठरवू शकते ना सरकार. कोणत्याही न्याय प्रक्रियेचा अवलंब न करता झटपट न्याय देण्याची ही कृती अयोग्य व बेकायदेशीरच म्हणावी लागेल. एखाद्या आरोपीला खोट्या चकमकीत मारायचे, त्याचे घर पाडायचे, त्याच्या दुकानावर नांगर फिरवायचा हे प्रकार अत्यंत अमानुष आणि घटनाबा आहेत. शिवाय ते नैसर्गिक न्यायतत्वाच्याही विरोधात आहेत. एखाद्याचा गुन्हा सिद्ध होण्याआधीच आरोपीचे घर जमीनदोस्त करण्याची कृती म्हणजे थेट कायदाच हातात घेण्यासारखे आहे. उत्तर प्रदेशात गुन्हेगारांना झटपट न्याय देण्याचा चुकीचा पायंडा पडला आहे. या देशात कायद्याचे राज्य आहे याचा सत्ताधा-यांना विसर पडलेला दिसतो. त्यातूनच बुलडोझर न्यायाचे फॅड आले असावे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने जी निरीक्षणे आपल्या आदेशातून नोंदवली आहेत ती प्रशासनाला शिस्त लावण्याबरोबरच राज्यकारभारावर दूरगामी परिणाम करणारी आहेत. कोणतीही मालमत्ता पूर्वसूचनेशिवाय पाडता येणार नाही. प्रभावित व्यक्तीला किमान पंधरा दिवसांची नोटीस द्यावी लागेल. गत काही वर्षांपासून काही राज्यांमध्ये कायदा धाब्यावर बसवून आरोपींची घरे पाडण्याच्या घटना वाढल्या आहेत. मुळात कोणताही आरोपी दोषी आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार महापालिका अथवा सरकारला नाही. ते काम न्यायालयाचे आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाशिवाय कोणत्याही आरोपीचे घर, दुकान बुलडोझरने पाडण्याचा अधिकार कोणत्याही नोकरशाहीला अथवा राज्य सरकारला नाही. त्यामुळे कोणत्याही मालमत्ता पाडण्यासंबंधी देशव्यापी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. हे आदेश अनधिकृत बांधकामांना लागू होणार नाहीत. बांधकाम पाडण्यासंबंधीच्या नोटिशीमध्ये कोणत्या कारणामुळे संबंधित मालमत्ता अतिक्रमित ठरवण्यात आली, त्याचा सविस्तर उल्लेख आवश्यक आहे. सत्ता आणि अधिकाराचा दुरुपयोग खपवून घेतला जाणार नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. कुणाच्याही डोक्यावरील छत हिसकावून घेणे म्हणजे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. कोणत्याही न्यायप्रक्रियेचा अवलंब न करता झटपट न्याय देण्याची ही कृती अयोग्य व बेकायदेशीरच म्हणावी लागेल.

# लिंबागणेश महावितरण उपकेंद्राचे अभियंता पद रिक्त असल्याने कर्मचा-याचा ढिसाळ कारभार ; अनागोंदी कारभार न थांबल्यास आंदोलनाचा ईशारा

**बीड प्रतिनिधी ,**

बीड:- (दि.१६) बीड तालुक्यातील लिंबागणेश ३३ के.व्ही. महावितरण उपकेंद्रात अजब कारभार पाहायला मिळत आहे. जिल्हा परिषद सर्कल चे असणारे गाव मात्र उपअभियंता हलकुडे यांची बदली झाल्यापासून लिंबागणेश येथील चार्ज हा कोणाकडे आहे हे काही कळेना झाले असुन वरिष्ठ अधिकाऱ्यांचें लिंबागणेशकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे. लिंबागणेश 33 के.व्ही. उपकेंद्रात कर्मचारी कोणीही वेळेवर हजर नसतात.ग्रामीण भागातील महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असुन पावसाळ्यात वीज ग्राहकांना अखंडित व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा म्हणून शहरी व ग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल आणि दुरुस्तीची रोहित्रांची तपासणी,आर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे, सैल झालेले गार्डींग व स्पन घट्ट करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्याची छाटणी, लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता ,रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे,स्टे वायरने वीजखांबाचा आधार मजबूत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे आर्थिंग सुस्थितीत करणे,फुटलेले पीन आणि इन्सुलेटर बदलणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे .मात्र कर्मचारी यांना नवीन काही वस्तू टाकण्यास सांगितले असता ते महावितरण कार्यालयात कुठलेही सामान उपलब्ध नाहीत असे उत्तरे देतात. नवीन उपअभियंता कधी येणारं आणि कोण येणार असा ग्रामस्थांना प्रश्न पडला आहे..

उपकेंद्रात कोणतेही साहित्य उपलब्ध नसते... ( लाईनमन,कर्मचारी महावितरण ) लाईट उपयोगी कुठलेही साहित्य महावितरण कार्यालयात उपलब्ध नसते उदाहरणार्थ, ट्रांसफार्मर बॉक्स, नवीन फेज, नवीन लग्ज आणि तसेच नवीन नटे देखील उपलब्ध नसतात. महावितरणचा अनागोंदी कारभार थांबला नाहीतर आंदोलनाचा ईशारा डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिला आहे.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# त्यांचं म्हणणं बरोबर पण शरद पवार साहेब: जरांगेंच्या येवला दौ-यावर भुजबळांची प्रतिक्रिया

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे येवल्याच्या दौऱ्यावर आहेत. येवला हा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचा मतदारसंघ आहे. मनोज जरांगे पाटील यांनी दौऱ्यावर जाण्यापूर्वीच शुक्रवारी स्पष्ट केलं होत की हा काही माझा राजकीय दौरा नाही. सहकाऱ्याची आजी वारली, त्यामुळे सांत्वनासाठी जाणार आहे. दरम्यान येवल्यात गेल्यानंतर मात्र मनोज जरांगे पाटील यांनी भुजबळांचं नाव न घेता त्यांना डिवचलं. हा काही माझा राजकीय दौरा नाही, मराठा बांधवांना ज्याला पाडायचं असेल त्याला पाडतील. मात्र मराठा समाजाला विरोध करणाऱ्याला पाडा, आता काही जण पडणार असतील तर त्याला मी काय करणार असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं होतं. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांच्या या दौऱ्यावर



छगन भुजबळ यांची पहिली प्रतिक्रिया सोमर आली आहे. दरम्यान आम्ही आता आरक्षणाच्या लढाईसाठी सामूहिक उपोषणाची तयारी करणार आहोत, असं काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं होतं. यावर देखील छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सरकार कोणाचं आलं तरी उपोषण करणार आहे. सरकार महायुतीचे स्थापन होणार यात शंका नाही. जे अधिकार लोकशाहीने दिलेले आहेत ते कोणीही हिसकावून घेऊ शकत नाही. शांततेने कोणीही लोकशाही मार्गाने आपलं म्हणण मांडू शकतो असं भुजबळ यांनी म्हटलं आहे.

## नेमकं काय म्हणाले भुजबळ?

मनोज जरांगे माझ्या मतदारसंघातील कोणाच्या तरी कुटुंबाची भेट घेण्यासाठी आले. कोणाच्या तरी येथे सांत्वनासाठी आले. दु:खाच्या प्रसंगात कार्यकर्त्यांच्या घरी जाणं चांगली गोष्ट आहे. त्यांनी म्हटलं की आरक्षणाला ज्यांनी विरोध केला त्यांना पाडा, तेही त्यांचं बरोबर आहे. मात्र शरद पवार साहेब, उद्धव ठाकरे साहेब, कॉंग्रेस, फडणवीस, शिंदे, अजितदादा आणि मी आम्ही कोणीच आरक्षणाला विरोध केलेला नाही, मी ज्यांची नावं घेतली त्या सगळ्यांचं म्हणणं एकच आहे की मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावं, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे.

# वृत्तपत्रात प्रसिद्ध होणा-या १९ व २० नोव्हेंबर रोजीच्या राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक

बीड, दि. 16,: सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाने राजकीय प्रचार जाहिरातींबाबत नियमावली ठरवून दिली आहे. यानुसार वृत्तपत्रात मतदानाच्या एक दिवस अगोदर (ता. 19 नोव्हेंबर) आणि मतदानादिवशी (ता. 20 नोव्हेंबर )प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) पूर्व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे.

निवडणूक काळात दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या राजकीय जाहिराती, बल्क एसएमएस, व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण करणेही आवश्यक आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण करण्यासाठी बीड जिल्हास्तरावर माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती (एमसीएमसी) कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. समिती, माध्यम कक्ष अपर जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, बीड येथे कार्यान्वित करण्यात आला आहे. उमेदवार किंवा प्रतिनिधींनी जाहिरात प्रसारित होण्याच्या किमान तीन दिवस अगोदर प्रमाणीकरणासाठी विहित नमुन्यातील अर्ज समितीकडे सादर करावा. विहित नमुना एमसीएमसी कक्षात उपलब्ध आहे. एमसीएमसी समितीकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर 48 तासांत अर्ज निकाली काढण्यात येतील. जाहिरात नियमानुसार नसल्यास प्रमाणीकरण नाकारण्याचा किंवा बदल सुचविण्याचा अधिकार एमसीएमसी समितीला आहे. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या 24 तासात उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन जाहिरात सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणिकराणासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करावा. त्यात जाहिरात निर्मिती खर्च, जाहिरात प्रसारण खर्च व कालावधी, उमेदवार किंवा पक्षाचे नाव, स्वतंत्र व्यक्ती असल्यास प्रतिज्ञापत्र आदी महत्वाच्या बाबींच्या नोंदीसह दोन प्रतीत साक्षांकित केलेली जाहिरात संहिता (स्क्रिप्ट) व दृक-श्राव्य चित्रीकरण सीडी किंवा पेनड्राइव्हमध्ये समितीकडे देण्यात यावे. उमेदवार व राजकीय पक्षाच्या ब्लॉग, संकेतस्थळावरील, वैयक्तिक सोशल मीडिया अकाऊंटवरून पोस्ट केलेला राजकीय स्वरुपाचा संदेश, मजकूर, छायाचित्र, व्हीडीओ मजकूर राजकीय जाहिरात समजली जाणार नाही, त्यामुळे त्यासाठी पूर्वप्रमाणीकरण आवश्यक नाही. तथापि, जाहिरातीचे प्रमाणीकरण आवश्यक आहे.

# शेतकरी कष्टकरी सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर - सुभाष कोल्हे



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड-लोहा : शेतकरी कष्टकरी सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे लोहा मतदार संघाचे उमेदवार सुभाष पाटील कोल्हे यांनी लोहा येथे मतदारांच्या डोअर टू डोअर भेटी दरम्यान केले.लोहा येथील मतदारांच्या डोअर टू डोअर भेटी घेऊन त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शेतीमालाला हमीभाव, दारूमुक्त गांव संभाजी ब्रिगेड ३३ वर्षापासुन शिव-फुले-शाहू-आंबेडकर या महामानवांच्या विचारावर कार्यरत आहे.समता, स्वातंत्र, बंधुता, न्याय या संवैधानिक मुल्यांवर आधारीत लोकशाही बळकट करण्यासाठी संभाजी ब्रिगेड कटीबध्द आहे. धर्मांध, जातीयवादी व समाजविधातक विचारधारेच्या ताब्यात वर्तमान लोकशाही गेली आहे. त्यांचे दुष्परीणाम लोकांना भोगावे लागत आहेत.या पार्श्वभुमीवर संभाजी ब्रिगेड निवडणूकीच्या संघर्षात उतरत आहे. लोकहितासाठी सहकार्य करून संभाजी ब्रिगेडचे उमेदवार विजयी करावेत असे प्रतिपादन यावेळी कोल्हे यांनी केले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संघटक माधव पवार, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, कंधार तालुकाध्यक्ष नितिन कोकाटे,किरण बाबर, उपाध्यक्ष संजय जाधव, किशन मोरे, सुनील टोनगे, परमेश्वर खोसे, अंकुश कोल्हे, नितीन सोरगे दिलीप दळवे, परमेश्वर बोडके प्रभाकर राऊत, भगवान दळवे, व्यंकटेश राऊत, वैभव बोडके, आदी उपस्थित होते.

# डॉ. ज्योती मेटे यांच्या प्रचारार्थ नाळवंडी येथे भव्य सभा; सभेला प्रचंड गर्दी

बीड (प्रतिनिधी) अपक्ष उमेदवार डॉ. ज्योती विनायकराव मेटे या बीड विधानसभा निवडणुकीच्या मैदानात बॅटरी टॉर्च हे निवडणूक चिन्ह घेऊन उतरल्या आहेत. बीड मतदारसंघातील पहिला प्रचार फेरीत त्यांनी आघाडी घेतली असून मतदारसंघातील सर्व गावांना त्यांनी भेट दिल्या आहेत. आता त्यांचा भर जाहीर सभेंवर आहे दी. १४ रोजी बीड येथे जाहीर सभा पार पडल्यानंतर काल त्यांनी नाळवंडी सर्कल मधील मतदारांशी संवाद साधण्यासाठी नाळवंडी येथे जाहीर सभेचे आयोजन केले होते. नाळवंडी सर्कलच्या जोरावर कायम येथील प्रस्थापितांनी सत्ता उपभोगली मात्र नाळवंडी सर्कलचा विकास केला नाही. नेहमीच या सर्कलला सावत्रपणाची वागणूक मिळाली मात्र आपण निवडून आल्यानंतर या सर्कलचा कायापलट



करू असे आश्वासन त्यांनी या सर्कल मधील तमाम जनतेस दिले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी नाळवंडी सर्कल मध्ये अनेक गावांना निधी दिला विकासाला चालना दिली या ठिकाणी घोडका राजुरी, नाळवंडी गावांना महत्वाचे असणारे पूल तयार करून दिले आपण देखील स.हेबांच्या कामाचं अनुकरण करत बीड ते नाळवंडी रस्त्याचे काम व्हावे याकरिता जिल्हाधिकारी यांच्या सह वरिष्ठ पातळीवर प्रयत्न केले आणि करत राहील परंतु आमदार झल्या नंतर मी हा रस्ता करण्यासाठी कटीबद्ध राहील असे अ.श्वासन देखील त्यांनी यावेळी दिले . या सभे प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद , जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, आशुतोष मेटे, सिताराम घुमरे, योगेश शेळके, बळी थापडे विजय सुपेकर डॉ. राजेंद्र बंड, राजेंद्र आमटे,चंदर राऊत, उल्हास घोरड ,गणेश कुटे, आदी. सह शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते व सर्कल मधील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या टीमने फोडला उमेदवार अनिलदादांच्या प्रचाराचा नारळ!

## सर्व मराठा सेवक ग्रामीण भागातील मतदारांच्या घेणार भेटी

बीड, प्रतिनिधी- अठरा पगड जाती धर्मातील बीड विधानसभा लोकप्रिय अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या टीमने पाठिंबा दिल्यानंतर अवघ्या टीमने मिळून आज सकाळी 11.00 वाजताच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करून वंदन केले व त्यानंतर शेकडो गाडयांचा ताफा घेऊन महाराष्ट्राची धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गड येथे श्री नगद नारायणा चरणी नतमस्तक होऊन अनिलदादा जगताप यांच्या प्रचाराचा



नारळ फोडला व प्रचाराचा शुभारंभ केला. याप्रसंगी सर्वांनी मिळून नारायण गड येथे हभप गुरुवर्य शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले. आज सर्व मराठा सेवक आपली वेगवेगळी टीम करून ग्रामीण भागातील मतदारांच्या घेणार भेटी घेणार असून बीड विधानसभा अपक्ष उमेदवार यांना बीड मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता विक्रमी मताधिक्याने निवडून आणा असे आवाहन मतदारांना करणार असल्याचे माध्यमांना सांगितले. याप्रसंगी सर्व मराठा समन्वयक तथा सकल मराठा सेवक उपस्थित होते. सन्मानीय मनोजदादा जरांगे पाटील यांनी आम्हाला सांगितले होते की, जो उमेदवार समाजासाठी कार्य करत आला आहे, जो मराठा आरक्षणाच्या लढ्यात आपलं योगदान देतोय व जो समाजाच्या फायद्याचा आहे त्याला निवडणून आणा. तुम्ही सर्वानुमते ठरवा आणि मला सांगा असे मनोजदादांना आम्हाला सांगितले होते. त्यानंतर आम्ही वीस जणांनी एकत्रित येऊन मराठा आरक्षणाच्या लढ्यात आपलं योगदान देणारे आणि सर्व जाती धर्मातील लोकांना बरोबर घेऊन चालणारे बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांना एकमुखी पाठिंबा दिला आहे व आज आम्ही सर्वांनी छत्रपती शिवारायांना वंदन करून श्री नगद नारायणा चरणी नतमस्तक होऊन बीड मतदार संघात प्रचाराला सुरुवात केली आहे. येणाऱ्या 20 नोव्हेंबर रोजी अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांना अनुक्रमांक 13 वरील चिन्ह शिवण यंत्र यावर बटन दाबून विक्रमी मतांना निवडून आणावे असे आवाहन मनोजदादा जरांगे पाटील यांच्या सर्व समर्थकांनी मिळून बीड मतदार संघातील मतदारांना केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १७ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अखेर प्रतीक्षा संपली; लाडक्या बहिणींसाठी गुड न्यूज, डिसेंबरचा हफ्ता कधी मिळणार? मोठी अपडेट



गरजू महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं राज्य सरकारनं महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. अर्थमंत्री अजित पवार यांनी अंतरीम अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली. ही राज्य सरकारची एक महत्त्वकांक्षी योजना आहे. मात्र सध्या ही योजना विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचाराचा मुख्य मुद्दा बनली असून, या योजनेवरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. जुलैपासून महिलांच्या बँक खात्यात या योजनेंतर्गत पैसे येण्यास सुरुवात झाली. निवडणूक आचारसंहितेमुळे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर अशा दोन महिन्यांचे ॲडव्हांस पैसे महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले. मात्र आता सर्वांनाच प्रतिक्षा आहे ती म्हणजे डिसेंबरचा हफ्ता कधी मिळणार. एकीकडे या योजनेवरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. ही योजना ऐन निवडणुकीच्या तोंडावर सुरू करून महिलांचे मत खरेदी करण्याचा प्रयत्न होत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे सत्ताधाऱ्यांकडून देखील विरोधकांना तोडीस तोड उत्तर दिलं जात आहे. आता या योजनेसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वात मोठी अपडेट दिली आहे.

नेमकं काय म्हणाले मुख्यमंत्री?

लाडक्या बहीण योजनेचा डिसेंबरचा हफ्ता हा मतदान झाल्यानंतर खात्यात जमा होणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना या योजनेवरून त्यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे मला म्हणालेत दहा दिवस थांबा की तुम्हाला पण जेलमध्ये टाकतो, लाडकी बहीण आणली म्हणून हा राग आहे का? सावत्र भावांना तुम्ही निवडणुकीत जोडा दाखवा, महाविकास आघाडीच्या पायाखालची वाळू सरकली आहे . विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम आम्ही करू, आमची नियत साफ आहे, हे सरकार देना बँक आहे घेना बँक नाही, निवडणूक झाल्यानंतर डिसेंबरचा हफ्ता खात्यामध्ये जमा होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे, ते रत्नागिरीमध्ये बोलत होते.

## सय्यद इरफान यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश आ. संदीप क्षीरसागरांना पुन्हा निवडून आणण्याची केली घोषणा

बीड (प्रतिनिधी) - शहरातील शहिंशहा नगर भागात राहणारे सय्यद इरफान यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आमदार संदीप क्षीरसागर यांना पाठिंबा देत राष्ट्रवादी शरद पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. तसेच आमदार संदीप क्षीरसागर यांना यावेळी सुद्धा मोठ्या मताधिक्क्याने पुन्हा बीड विधानसभा मतदारसंघातून निवडून आणू असे म्हटले. यावेळी माजी आमदार तथा मेफ्कोचे माजी अध्यक्ष सय्यद सलीम यांच्यासह राष्ट्रवादी पक्षाचे अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सय्यद इरफान म्हणाले की, आमदार संदीप





क्षीरसागर हे अगदी छोट्यात छोट्या, तळागाळातील तरुणांना एखाद्या मित्रासारखे, भावासारखे भेटतात, आस्थेने विचारपूस करतात. मोठ्यांचा आदर सन्मान करतात. आमदार झाल्यापासून त्यांनी बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात कोणताही भेदभाव न करता स्वपक्षीयांसह विरोधकांची ही कामे केली आहेत. यामुळे या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी शरद पवार पक्षात आम्ही सर्वांनी प्रवेश केला आहे. या निवडणुकीत संदीप भैय्यांच्या खांद्याला खांदा लावून प्रचाराच्या उरलेल्या दिवसात जोरात प्रचार करणार असून जास्तीत जास्त मतदान संदीप भैय्यांना मिळावे आणि ते मोठ्या मतांनी विजयी व्हावे. यासाठी तन-मन-धनाने काम करणार आहोत असे म्हटले.

यावेळी सय्यद तौफिक, शेख माजेद, मुसेब बागवान, रिजवान बागवान, हामेद चाऊस, शेख रईस, सचिन गायकवाड, रेहान बागवान, शेख साहिल, रमेश राऊत, मुबीन पठाण, सोहेल पठाण, इमरान पटेल, शाकीर खान, शेख सोफियान, शेख नौशाद, पठाण आरिफ, शेख फैजान, शेख सोफियान, राजू मोमीन, आफताब शेख, सज्जाद शेख, साहिल पठाण, शेख समीर, एजाज शेख, मेहराज शेख, अल्ताफ भाई, सय्यद अक्रम, मोनू पठाण यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी आमदार सलीम यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश केला. यामुळे आमदार संदीप क्षीरसागर यांची बाजू या निवडणुकीत अजून भक्कम झाली आहे.

### गडकरींनी सर्वांची मनं जिंकली

सांगलीच्या मिरजमध्ये केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते नितीन गडकरी यांची प्रचार सभा पार पडली. या सभेत बोलताना त्यांनी राज्यात सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती जनतेला दिली. सांगली जिल्ह्यात आतापर्यंत 12 हजार कोटी दिले, 9 कामं पूर्ण झाले 9 प्रगती पथावर आहेत. अजून कोट्यावधी रुपयांची कामे मंजूर केली आहेत, ती लवकरच सुरू होतील. मुंबई ते बंगळुरू पंचावन्न हजार कोटींचा प्रस्ताव मंजूर केला आहे, त्याच्या कामाला सुरुवात देखील झाली आहे. पुणे, बंगळुरू हा हायवे 800 किलोमीटर आहे. तुम्हाला सहा तासांमध्ये बंगळुरूवरून पुण्याला सहज पोहोचता येईल असा आपला प्रयत्न आहे. सगळीकडे हिरवं पाहायला मिळाले,यामुळे मनापासून मला आनंद होत आहे.



## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.महेश धांडे

बीड (प्रतिनिधी) दि.१६ : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.महेश धांडे यांची निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यांच्या निवडीबद्दल पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे. ॲड.महेश धांडे हे सामाजिक चळवळीतील युवक कार्यकर्ते आहेत. पूर्वीपासून महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासमवेत ते काम करतात. त्यांच्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बीडमध्ये नुकत्याच झालेल्या सभेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश नाईकवाडे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान, युवकांचे संघटन मजबूत करून पक्ष वाढीसाठी सक्रियपणे योगदान देणार असल्याची प्रतिक्रिया ॲड.महेश धांडे यांनी दिली.

## हिंदू खतरें में म्हणता, मग हल्ला केलेले सराटीतील आंदोलक हिंदू नव्हते का?

### जयंत पाटील यांचा सवाल; विचाराने पक्के असलेले महेबूब शेख यांना निवडूण देण्याचे आवाहन

पाटोदा: निवडणूका आल्या की हिंदू खतरे में है, असे म्हटले जाते. मग अंतरवाली सराटी शांततेत आंदोलन करणाऱ्या लोकांवर पोलीसांकरवी हल्ला केला ते लोक हिंदू नव्हते का?, त्यांचावर हल्ला का केला. यामुळे या सरकारची चाल ओळखून आता विचारांनी पक्के असलेले महेबूब शेख यांना निवडून द्या, असे अवाहन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. पाटोदा येथे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार महेबूब शेख यांच्या प्रचारार्थ पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवाजी राऊत, सतिष शिंदे, आनंद जाधव, मा.आ.उषा दराडे, महादेव नागरगोजे, गुलाबराव घुमरे, नरसिंह जाधव, तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव, शिवसेना जिल्हाध्यक्ष परमेश्वर सातपुते, विक्रम मस्के, विद्याधर येवले, आण्णासाहेब येवले



यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, एकीकडे लाडकी बहिनीला पैसे दिल्याचे सांगता पण दुसरीकडे महागाई किती वाढली, हे सांगत नाहीत. आता वर्षाला नागरिकांकडून ९६ हजार रूपये काढतात आणि इकडे पाच हजार रूपये वाटल्याची टिमकी वाजवितात. आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात महेबूब शेख यांच्या रूपाने तरूण चेहऱ्याला संधी आम्ही दिली आहे. आपण त्यांच्यामागे ठामपणे उभा रहावे, पाटोद्याला ३५ वर्षापुर्वी एमआयडीसीसाठी जमीन घेतली मात्र, पुढे काहीच झाले नाही. मग येथील नेत्यांनी केले काय. महेबूब शेख यांनी आजवर महाराष्ट्र पिंजून काढला आहे. हा तरूण सभागृहात गेला तर ते सभागृह गाजवून सोडतील आणि सामान्य माणसांचा आवाज बनतील. याठिकाणी मतदारसंघात काही लोकांना निवडणूक आपली मक्तेदारी असल्याची भावना झाली आहे. यातील काहींनी शरद पवारांसोबत गद्दारी केली. या गद्दारांना प्रायश्चित्त द्या. येणाऱ्या काळात महेबूब शेख यांच्या माध्यमातून या मतदारसंघातील सर्व प्रश्न मार्गी लावू, असा शब्दही जयंत पाटील यांनी दिला.

○ ○

### फडणविसला मुख्यमंत्री करायचे का?, लोक म्हणाले नाही...

राष्ट्रवादीचे उमेदवार महेबुब शेख यांनी अंतरवाली सराटी येथील मराठा बांधवावर हल्ला कोणी केली. आंदोलन करणे चुकीचे होते का, हे सर्व फडणविस यांनी केले. आता पुन्हा त्यांना मुख्यमंत्री करायचे आहे का?, असे म्हणताच, लोकांनी नको, असे म्हटले. निवडणूक जातीपातीवर आणू नका, लोकसभेत तुमची जात कुठे गेली होती, असा प्रश्नही त्यांनी यावेळी अप्रत्यक्षपणे विरोधकांना विचारला.

**आनंद जाधवांचा प्रवेश अन् टाळ्यांचा कडकडाट**

पाटोदा येथील आनंद जाधव हे मोठे प्रस्त आहे. पंचायत समितीचे सभातपीपद त्यांच्या घरात राहिलेले असून तालुक्यातील गावागावात त्यांची मित्रमंडळी मोठ्या प्रमाणात आहे. मागील काही वर्षांपासून ते भाजपमध्ये नाराज दिसत होते. अनेकदा त्यांनी पक्षाच्या कार्यक्रमाला जाणे देखील टाळलेले दिसत होते. अखेर जयंत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी शनिवारी राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. त्यांच्यासोबत अनेक सरपंच देखील राष्ट्रवादीत दाखल झाले.

○ ○

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com